# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०७ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- नक्षलवादाविरोधातली लढाई अंतिम टप्प्यात–मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होणार– केंद्रीय गृहमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- अन्नपदार्थातली भेसळ रोखण्यासाठी देशभरात १०० प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार
- यंदाचं विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर

आणि

- युवकांनी सुशिक्षित होत असतांनाच सुसंस्कारित व्हावं–छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचं आवाहन

****

नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी शस्त्रांचा त्याग करून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन त्यांनी केलं. या बैठकीला महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे या राज्यांमधल्या नक्षलवादी कारवायांमधे ७२ टक्के घट झाली असून नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. सरकारनं या भागात दळणवळण आणि संपर्क

व्यवस्थेच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं. या भागात १४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यात आले तसंच सहा हजार मोबाईल टॉवर्स उभारण्यात आल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली.

चालू वर्षात २०२ नक्षलवादी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकींमधे मारले गेले तर ८१२ जणांना अटक झाली. या वर्षात ८१२ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या आता ३८ पर्यंत खाली आली असल्याची माहिती गृह मंत्रालयाने दिली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत बोलतांना, उत्तर गडचिरोली भाग हा सशस्त्र नक्षलवाद्यांपासून मुक्त झाल्याचं सांगितलं. नक्षलवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्रानं मोठं यश मिळवलं असून, त्यामुळे या भागात भीती आणि दहशतीवर मात केल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

****

भारताने सदैव मालदिवसाठी चांगल्या शेजाऱ्याची भूमिका निभावली असून, या परस्पर सहकार्याला धोरणात्मक दिशा देण्यासाठी सर्वसमावेशक अशा आर्थिक आणि सागरी सुरक्षेला प्राधान्य असल्याचं, प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज नवी दिल्ली इथं मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू यांच्याबरोबर प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा झाल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उभय देशांमध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आले.

****

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची उद्या मोजणी होणार आहे. उद्या सकाळपासून केंद्रशासित प्रदेशातल्या वीस मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणीला सुरुवात होईल. हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणीही उद्या होणार आहे.

****

अन्नपदार्थातली भेसळ रोखण्याच्या दृष्टीनं तसंच गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीनं केंद्रीय अन्नप्रक्रीया उद्योग मंत्रालयातर्फे देशभरात १०० प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार आहेत. केंद्रीय अन्नप्रक्रिया आणि उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी आज फिक्कीतर्फे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ही माहिती दिली. अन्नपदार्थांची नासाडी थांबवण्यासाठी रेडिएशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल असं ते म्हणाले. भारतीय मानकांना भविष्यात जागतिक मानकं म्हणून मान्यता मिळावी, तसंच उद्योग जगतानं

देशातल्या उत्पादनांच्या विविधतेचा पूर्ण वापर करण्याचं आवाहन पासवान यांनी केलं आहे.

****

यंदाचा केशवसृष्टी पुरस्कार मुंबईतल्या `टीच` संस्थेचे संस्थापक अमन शर्मा यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार निवड समितीच्या सदस्य आणि मुंबईच्या माजी महापौर डॉ. शुभा राऊळ यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे आहे. मूकबधीर मुलांचं उच्च शिक्षण, विविध क्षेत्रातलं कौशल्य शिक्षण आणि त्यांना उत्पन्नाच्या संधीं मिळवून देण्यासाठी 'टीच' संस्था काम करते. येत्या १३ तारखेला विलेपार्ले इथं आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार दिला जाईल.

****

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचा ५७ ना वा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर झाला आहे. समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. येत्या ५ नोव्हेंबरला रंगभूमी दिनी, सांगली इथं हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल सुहास जोशी यांनी आकाशवाणीशी बोलतांना आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या –

> ***हा विष्णूदास भावे पुरस्कार माझ्या दृष्टीने खूप खूप महत्वाचा आहे. कारण महाराष्ट्रातला एक महत्वाचा पुरस्कार तो आहे. आणि पन्नास वर्ष काम केल्याचं चीज झालं असं आज वाटतंय. आणि ज्या पद्धतीनं पन्नास वर्ष मी काम करत आलेय, त्याचा हा गौरव महाराष्ट्राने केलाय असं मला वाटतंय आणि खूप आनंद झाला.***

****

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. इंदापूर इथल्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आग्रहामुळेच हा निर्णय घेतल्याचं पाटील यांनी सांगितलं. हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता यांनीही भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

दरम्यान, आमदार बच्चु कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे मेळघाट विधानसभेचे आमदार राजकुमार पटेल हे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. येत्या १० ऑक्टोबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेळघाट दौऱ्यावर येणार असून त्यांच्या उपस्थितीत आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती पटेल यांनी दिली.

****

मुंबईत नायगाव इथल्या बीडीडी चाळीचं काळात 'शरद पवार नगर' हे नाव बदलून 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल' असं नामकरण करण्यात आलं आहे. ही चाळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली असून, या चाळीमध्ये बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या प्रमाणावर राहतात. त्यांची आणि स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी मान्य करत हे नामकरण करण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीची आज नवरात्र महोत्सवाच्या पाचव्या माळेला रथ अलंकार महापूजा बांधण्यात आली. भगवान सूर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला, अशी आख्यायिका यामागे सांगितली जाते. दरम्यान, उद्या सहाव्या माळेला देवीची मुरली अलंकार महापूजा बांधली जाणार आहे.

****

नंदुरबार जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने भूकंपाचे धक्के बसत आहेत. दोन ऑक्टोबर रोजी २ पूर्णांक ३ तीव्रतेचा, ४ ऑक्टोबर रोजी २ पूर्णांक २ तीव्रतेचा, तर ५ ऑक्टोबर रोजी १ पूर्णांक २ तीव्रतेच्या धक्क्याची नोंद झाली. भूकंपाचे हे धक्के अतिशय सौम्य असून, कोणत्याही प्रकारचं नुकसान झालेलं नाही. नवापूरच्या तहसीलदार कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवलेल्या पत्रात ही माहिती देण्यात आली आहे.

****

युवकांनी शिक्षण घेऊन सुशिक्षित होत असतांनाच सुसंस्कारितही व्हावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'युवा संवाद' या उपक्रमास आजपासून सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. व्यक्तिमत्व चांगलं असणे म्हणजे त्याचा बौद्धिक विकास झालेला असणे होय, आधुनिकतेच्या नावाखाली

आपण आपल्या संस्कारापासून दूर जात आहोत, याकडे स्वामी यांनी लक्ष वेधलं. युवासंवाद या कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केलं.
दरम्यान, निवडणुकीचं कामकाज करतांना सर्व विभागांचा समन्वय आवश्यक असल्याचं, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व नोडल अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण पार पडलं, त्यावेळी ते बोलत होते. मतदार जनजागृती करुन नैतिक मतदानाचं महत्त्व मतदारांना पटवून देण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं बौद्ध लेणी परिसरातल्या प्रस्तावित कारवाईच्या विरोधात आज शहरातून मोर्चा काढण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात बौद्ध धर्मगुरु, वकील संघाचे सदस्य, आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बौध्द लेणीला जागतिक तीर्थस्थळ म्हणून दर्जा द्यावा, यासह अन्य मागण्या मोर्चकऱ्यांनी केल्या.
दरम्यान, मातंग समाजाच्या वतीने आज छत्रपती संभाजीनगर इथं आरक्षण क्रांती पदयात्रा काढण्यात आली. विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत गेलेल्या या पदयात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते.

****

उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास ग्रामविकास आणि पंचायत राज विभागामधील शासनाचा एक नियमित विभाग म्हणून मान्यता देणे, त्या अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणे यासह अन्य मागण्यांसाठी नांदेड इथं आज उमेद अंतर्गत कार्यरत महिला आणि कर्मचाऱ्यांनी आंदोलन केलं. मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष इरवंत सूर्यकर यांनी दिला आहे.
दरम्यान, बीड इथंही जिल्हा परिषद कार्यालयासमोर उमेद– महिला आणि कर्मचारी संघटनेच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन सुरू करण्यात आलं आहे.

****

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या ज्येष्ठ नागरिकांना घेऊन, येत्या १२ ऑक्टोबर रोजी पहिली रेल्वे अयोध्येला जाणार आहे. तरी या योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी अयोध्या धाम इथं जाण्यासाठी तयार रहावं, असं आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केलं आहे.

****